# तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य

३, महापालिका मार्ग, पत्रपेटी क्रमांक १९६७, मुंबई ४०० ००१.

E-mail :- desk2A@dte.org.in Web :- http://www.dte.org.in


क्रमांक :२अ/एडीएम/शपथपत्र/२०११/४३८

महत्वाचे/ कालमर्यादित

दिनांक :-

13 APR 2011

प्रति,
सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,
मुंबई/पुणे/नाशिक/औरंगाबाद/नागपूर/अमरावती

**विषयः- शैक्षणिक वर्ष २०११-१२ मधील प्रथम वर्ष व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या प्रवेश प्रक्रियेबाबत..**

शैक्षणिक वर्ष २०११-१२ मधील प्रथम वर्ष एमबीए/एमएमएस/पीजीडीएम, एमसीए पदव्युत्तर पदवी तसेच प्रथम वर्ष अभियांत्रिकी, औषधनिर्माणशास्त्र, वास्तुशास्त्र, आणि हॉटेल मॅनेजमेंट अँण्ड कॅटरिंग टेक्नॉलॉजी पदवी अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठी आपल्या विभागातील सर्व विनाअनुदानित संस्थाकडुन त्या संस्था शासनाच्या सीईटीमध्ये व केंद्रीभुत प्रवेश प्रक्रियेत सहभागी होवू इच्छित असल्याबाबतचे रुपये १००/- च्या स्टॅम्प पेपरवर हमी पत्र सादर करणे आवश्यक आहे. याबाबत संदर्भाधीन पत्रान्वये आपणांस कळविण्यात आले होते त्यानूसार बहुतांशी एमबीए/एमएमएस व एमसीए अभ्यासक्रमाच्या संस्थांची हमीपत्रे या कार्यालयास प्राप्त झालेली आहेत.

त्याचप्रमाणे आपल्या विभागातील पीजीडीएम पदव्युत्तर पदवीका अभ्यासक्रमाच्या शासनाच्या केंद्रीभुत प्रवेश प्रक्रियेकरिता तसेच अभियांत्रिकी, औषधनिर्माणशास्त्र, वास्तुशास्त्र, आणि हॉटेल मॅनेजमेंट अँण्ड कॅटरिंग टेक्नॉलॉजी पदवी अभ्यासक्रमाच्या अभ्यासक्रम चालविण्या-या सर्व विनाअनुदानित संस्थाकडुन शासनाच्या सीईटीमध्ये केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेत सहभागी होवू इच्छित असल्याबाबतचे रुपये १००/- च्या स्टॅम्प पेपरवर हमीपत्र दिनांक १५.०५.२०११ पूर्वी सादर करण्यास कळविण्यात यावे, अन्यथा सदर संस्थेचे नाव माहितीपुस्तकात अंतर्भूत करण्यात येणार नाही,याची नोंद घेण्यास संस्थेला कळवावे.

(डॉ. सु. का. महाजन)
प्र. संचालक
तंत्रशिक्षण संचालनालय, मुंबई

---

जा.क्र. :- तंशि/विकाना/तांशा/२०११/ 637

दि. 26 ~~MAR 2011~~

26 APR 2011

प्रति,
प्राचार्य,
विनाअनुदानित
अभियांत्रिकी, फार्मसी, एच.एम.सी.टी., वास्तुशास्त्र,एम.बी.ए., एम.सी.ए.
पदवी व पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमाच्या संस्था, नाशिक विभाग.

संचालनालयाच्या सदर पत्रातील सूचनेची नोंद घेवून ज्या संस्थानी शासनाच्या केंद्रीभूत प्रवेश पकियेमध्ये सहभागी होण्याबाबतचे रु.१००/- च्या स्टॅम्पपेपरवर हमीपत्र अदयापपर्यंत संचालनालयास सादर केलेले नसेल अशा संस्थानी सदर हमी पत्र दिं.१५.५.२०११ पूर्वी संचालनालयास सादर करण्यात यावे अन्यथा सदर संस्थेचे नाव माहितीपुस्तकात अंतर्भूत करण्यात येणार नाही याची नोंद घेण्यात यावी. तसेच सदर हमीपत्राची एक छांयाकित प्रत या कार्यालयास पाठविण्यात यावी.

(दि.रा.नंदनवार)
सहसंचालक
तंत्रशिक्षण, विभागीय कार्यालय, नाशिक